
## We are Proud of our Alumni!!
## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.








**Mr. Sandip Wagh, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2016-17 MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and** persuing a he is Currently**pre-sea training in** Marine **Engineering** at Institute of Marytime Studies (IMS) ,Goa.

लहानपणी सिंदबाद जहाँजी या साहसी व प्रामाणिक दर्यावर्दी (खलाशाची ) गोष्ट सर्वांनी ऐकली असेलच. निळ्याशार समुद्रांत , शुभ्र आकाशाखाली , शिडाच्या महाकाय जहाजांतून , सातत्याने जलप्रवास करत ,येणाऱ्या संकटांचा आणि आव्हानांचा नेटानं मुकाबला करत ,आपल्या विजिगिषु वृत्ती, समयसूचकता ,व प्रामाणिकपणा या गुणांच्या मदतीने, अनेक प्रवास यात्रा विस्मरणीय बनवणारा..... सिंदबाद ....

दहावी -बारावीच्या अनेक विदयार्थ्यांना ,एरोनॉटिकस व मरीन इंजिनीरिंग या मेकॅनिकल इंजिनीरिंगच्या महत्वाच्या उपशाखांबद्दल आकर्षण वाटतं, आणि त्यांत करीयर करण्याची संधी मिळावी अशी त्यांची इच्छा असते. परंतु अभियांत्रिकीच्या इतर शाखांच्या प्रमाणांत कमी संख्येने उपलब्ध असणाऱ्या शिक्षण संस्था व मर्यादीत प्रवेश क्षमता, यामुळे बऱ्याच विदयार्थ्यांना त्यांत प्रवेश मिळवणे शक्य होत नाही. परंतु या शाखांमध्ये व त्यातही मरीन इंजिनीरिंग या शाखेत, प्रवेश मिळवण्याची व करीयर करण्याची संधी ह्या विदयार्थ्यांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या, मेकॅनिकल इंजिनीरिंग या मुलभूत शाखेतून डिप्लोमाचा (पदविका) तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मिळू शकते, ही बाब बऱ्याच जणांना अवगत नसते. किंबहुना, मेकॅनिकल व मरीन इंजिनीरिंगच्या अभ्यासक्रमातील बरेच विषय समान व परस्परपूरक असतात. सद्यःस्थितीत मेरीटाईम व्यवसायात, शिपिंग उद्योगांतील अनुभवी मनुष्यबळाची कमतरता भासत असल्याने, मेकॅनिकल इंजिनीरिंग मधील पदविका किंवा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या, चांगल्या मेकॅनिकल अभियंत्यांना मरीन इंजिनीरिंग तसेच मर्चन्ट नेव्हीमध्ये करीयर करण्याची संधी, सुलभतेने प्राप्त होऊ शकते.

मरीन इंजिनीरिंग या मेकॅनिकलच्या उपशाखेत, वॉटर क्राफ्ट्स ,किंवा इंजिनीरिंग ऑफ बोटस तसेच तेल विंधन यंत्र (Oil Rigs or Marine Vessels) व सागरी अभियांत्रिकी या विषयांचा समावेश होतो. यांत मुख्यतः मेकॅनिकल व विद्युत अभियांत्रिकी मधील मूलभूत तत्वांचा व सिद्धांताचा उपयोग करून, पाण्यावर चालणाऱ्या वाहनांची निर्मिती व डीझाईन तसेच त्यांची दुरुस्ती व देखभाल, हे विषय शिकवले जातात. मरीन इंजिनीअर हे, भारतीय नाविक दल (Naval Forces), खाजगी कार्गो शिप किंवा सबमरीन यांत तंत्रज्ञ व पायलट म्हणून, महत्वाची भूमिका पार पाडत असतात. उत्तम वेतन पॅकेज (वेतन भत्ते व सोयी-सुविधा), आकर्षक युनिफॉर्म ,स्वयंशिस्त , शारीरिक तंदुरुस्ती, प्रवास व जगभरातील विविध देशांना भेट

देण्याची व तिथल्या संस्कृती, भाषा व पर्यटन स्थळांना जाणून घेण्याची संधी, यासोबतच मरीन इंजिनीअर्सना संरक्षण क्षेत्र ,तेल उद्योग तसेच खाजगी शिपिंग व्यवसायांत आणि मर्चन्ट नेव्ही मध्ये काम करण्याची संधी सातत्याने मिळत असते.

श्री संदीप वाघ , हा मेट पॉलीटेकनिकचा, यंत्र अभियांत्रिकी विभागाचा, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये उत्तीर्ण विद्यार्थी. त्यानेदेखील शालेय जीवनातच, मरीन इंजिनीअरिंग मध्ये करीयर करण्याचं स्वप्नं बघितलं होतं . त्या दिशेनं पहिलं पाऊल म्हणजे ,त्याने मेकॅनिकल शाखेत, पदविका अभ्यासक्रमाला घेतलेला प्रवेश. त्यानंतर त्याने पदविका अभ्यासक्रमा बरोबरच व्यक्तिमत्व विकास व संभाषण कौशल्य (English Speaking) यांकडे विशेष लक्ष देत ते वृधिंगत करण्याचा प्रयत्न केला व मेहनतीने व चिकाटीने डिप्लोमा अभ्यासक्रम विशेष प्राविण्यासह पूर्ण केला. डिप्लोमानंतर ,त्याच्या बॅच मधल्या इतर मित्रांनी ज्याप्रमाणे ,पदवी परीक्षेसाठी पारंपरिक पर्याय म्हणून, मुळ शाखा मेकॅनिकल मध्येच प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला ,तसा न घेता ,आपली वेगळी वाट चोखाळत, आपल्या स्वप्नांच्या दिशेने जाण्याचा निर्णय घेत, त्याने Maharashtra Academy of Naval Education & Training (MANET), Pune या संस्थेत Graduate Marine Engineering (GME) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. संपूर्ण भारतात, काही निवडक, मान्यताप्राप्त संस्थांमध्ये, Directorate General of Shipping, India अंतर्गत हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. प्रत्येक संस्थेची प्रवेशप्रक्रिया ही वेगळी असून इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष अधिकृत संस्थेमध्ये जावून ,विस्तृत माहिती मिळवून , त्यासाठी प्रवेश निश्चित करणे आवश्यक असते .

मेकॅनिकल इंजिनीअरिंग मध्ये पदविका व पदवी पूर्ण करणाऱ्या, मेकॅनिकल अभियंत्यांना Institute of Maritime Studies , Goa ही संस्था मरीन इंजिनीअर अधिकारी बनविण्यासाठीचे प्रशिक्षण (Pre Sea Training) देण्यात अग्रेसर आहे. येथील प्रशिक्षणानंतर, प्रत्यक्ष शिपवर प्रशिक्षणार्थी अभियंता (Trainee Marine Engineer) म्हणून काम करण्याची संधी ह्या मरीन इंजिनीअर्सना मिळते. त्यानंतर ६ महिन्यांच्या प्रत्यक्ष अनुभवानंतर, ५th Engineer/४th Engineer, ३rd Engineer या पदांवर व त्यानंतर एका वर्षाच्या नियमित सेवेनंतर, २nd Engineer व सर्वांत शेवटी दोन वर्षांच्या अनुभवानंतर, मुख्य अभियंता (Chief Engineer) अशाप्रकारे, मर्चन्ट नेव्हीतील करीयर आलेख उंचावत जातो. सध्या संदीप देखील हा Pre Sea Training Course उपरोक्त संस्थेत पूर्ण करत आहे.

त्याचमुळे मरीन इंजिनीअरिंग मध्ये करीयर करू इच्छिणाऱ्या, जगभ्रमंतीची आवड असणाऱ्या आणि आव्हानात्मकतेला सामोरे जावू इच्छिणाऱ्या,आधुनिक सिंदबादानी निराश होण्याचं कारण नाही. कारण , संदीप सारखंच, त्यांनाही आपल्या आवडत्या क्षेत्रांत काम करण्यासाठी, संधींचे दरवाजे खुले होणार आहेतच, गरज आहे ती फक्त ही संधी ओळखण्याची ..

"अनंत अमुची ध्येयासक्ती , अनंत अन आशा, किनारा तुला पामराला" या गर्जनेसह आपल्या आवडत्या क्षेत्रांत यशस्वी करण्यासाठी आणि उज्ज्वल भवितव्यासाठी संदीपला मनःपूर्वक शुभेच्छा....

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे,**
विभागप्रमुख-यंत्र अभियांत्रिकी विभाग,
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी , नाशिक.